# तपस्वी लेखक वि. स. खांडेकर

रा. अ. कुंभोजकर

१९४३ साली श्री. म. माटे यांच्या अध्यक्षतेखाली सांगली येथे भरलेल्या साहित्य संमेलनानंतर पुन्हा ६४ वर्षांनी माझे बालमित्र प्रा. म. द. हातकणंगलेकर यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन भरत आहे, हा एक आनंददायी अमृतयोग आहे असे म्हणायला हवे. १९४३ सालच्या साहित्य संमेलनातील भावे नाट्यमंदिरात दिवसभर ऐकलेली साहित्यिकांची भाषणे रात्रीही माझ्या मनात तरंगत होती पण मी झपाटलो होतो ते भाऊसाहेब खांडेकरांच्या भाषणाने ! पुढे तीन चार वर्षात त्यांचा व आपला परिचय होणार आहे, त्यांचा लेखनिक म्हणून सहा वर्षे त्यांच्या सहवासात आपल्याला रहायला मिळणार आहे याची त्या क्षणी मला सुतराम् कल्पना नव्हती. पण माझे नशीब बलवत्तर म्हणून लवकरच हा योग घडून आला. १९४७ चे ते वर्ष असावे. याच सुमारास मी सांगलीहून भाऊसाहेबांना एक पत्र लिहिले, आणि आपली काही पुस्तके मी वाचली आहेत नि आपल्याला ती फार आवडली आहेत, आपला लेखनिक होण्याची संधी मला दिलीत तर आपल्याकडे काम करण्याची माझी इच्छा आहे. असे त्या पत्रात, त्यांचा योग्य तो आदर प्रगट करुन मी लिहिले. पत्र जाण्याचा अवकाश, लगेच दोन दिवसांनी भाऊसाहेबांचे उत्तरही आले. त्यांनी लिहिले होते, माझ्या पासूनची तुमची अपेक्षा आणि माझी मर्यादा यात फारसा विसंवाद येत नसेल तर माझे लेखनिक होऊन तुम्ही माझ्यासमवेत राहू शकाल ! शक्य तितक्या लवकर तुम्ही कोल्हापूरला येऊन मला भेटावे. त्यांनी पत्रात अपेक्षा हा शब्द वापरला असला तरी त्यांच्यापासून माझी कसलीच अपेक्षा नव्हती. त्यांच्या घरी राहून त्याचा लेखनिक होता येणे हेच माझ्या दृष्टीने भाग्याचे ठरणार होते.!

कोल्हापुरातील मास्टर विनायक यांच्या बंगल्यात भाऊसाहेबांच्याबरोबर माझे वास्तव्य होते. भाऊसाहेबांची बहुतेक पुस्तके त्यावेळी देशमुख आणि कंपनीने प्रकाशित केलेली होती. आता मात्र या पुस्तकांच्या बहुतेक आवृत्या मेहता पब्लिशिंग हाऊसने सुनील कुमार लवटे यांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेसह प्रकाशित केल्या आहेत. ही पुस्तके चाळताना त्यातील कोणकोणते लेखन आपल्याला हातून उतरले आहे हे तपासून पाहण्याचा चाळा पुढे काही वर्षे मी करीत होतो.

हे काही असले तरी माझे तुडुंब वाचन झाले. ते भाऊसाहेबांच्या घरी ! एक लेखक हाती घेतला की तो पूर्ण करुन दुसऱ्या लेखकाकडे वळण्याची माझी सवय होती. चिं. वि. जोशी, शामराव ओक, लक्ष्मणराव सरदेसाई, अनंत काणेकर, र. वा. दिघे, वामन चोरघडे आदि. लेखक मी याच पध्दतीने संपवीत गेलो. यातले ह्यात असलेले लेखक कारणपरत्वे कोल्हापूरला भाऊ साहेबांच्याकडे येत. साहजिकच तेव्हा त्यांच्याशी ओळखी होण्याचा योग मलाही आला. भाऊसाहेबांचा पत्रव्यवहार जसा साहित्यिकांशी होत तसाच गुणी प्राध्यापक–शिक्षकांशी आणि सामाजिक कार्यकर्त्यांशीही होता. त्याचे मिरजेचे सन्मित्र श्री. वसंतराव आगाशे यांच्याशी भाऊ पत्रांतून साहित्यविषयक संवाद साधीत. ती पत्रे म्हणजे अनेक वाड्मयविषयक प्रश्न आणि त्यांची उकल असे एका भेटीत वसंतरावांनी हे अमोल धन मला दाखविले. त्यातील काही पत्रे आपल्या हस्ताक्षरातील आहेत, हे पाहून मला आनंद वाटल्याशिवाय राहिला नाही. अनेक साहित्यिक आणि कवी यांचा भाऊंच्याकडे अधूनमधून राबता असे. कवी यशवंत गिरीश, बा. भ. बोरकर, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज अनंत काणेकर वा. रा. ढवळे, वामनराव चोरघडे अशा अनेकांचा भाऊसाहेबांकडे संपर्क असे. यातले सर्वच साहित्यिक आज काळाच्या पडद्याआड गेले असले तरी, त्यांच्याशी आपली ओळख झाली होती ही जाणीव आजही मला आनंद देऊन जाते साहित्य प्रांतात नंतर मोठे झालेले रणजित देसाई व माझे बालमित्र प्रा. म. द. हातकणंगलेकर यांचा आपण भाऊसाहेबांशी परिचय करुन दिला याचे मला वाटणारे समाधानही तेवढेच मोठे आहे.

भाऊसाहेबांची लिहिण्याची विशिष्ट अशी वेळ नव्हती, दिवसाच्या कोणत्याही वेळेत ते मजकूर सांगत. दुपारी १ ते ३ हे दोन तास त्यांच्या वामकुक्षीचे असत. त्यामुळे या वेळेत मलाही विश्रांती मिळे. रात्री ९ ते ११ पर्यंतचे लेखन सुचितपणे व सलग होऊन या वेळेत स्वैपाकघरातली कामे आटोपून सौ. उषाताईंही अर्धा पाऊण तास आमच्या बैठकीस येऊन बसत. त्या आल्या की भाऊही आपले लेखन थांबवीत. लेखनतंद्री भंग पावली म्हणून त्यांनी कधीही डोक्याला आठ्या घातल्या नाहीत. जणू हा अर्धा पाऊण तास त्यांनी उषाताईंना देऊनच टाकलेला असे. मग या बैठकीत त्या कधी नातलगांच्या, कधी मैत्रिणींच्या, कधी शेजारी राहणाऱ्या सुमतीबाई क्षेत्रमाड्यांच्या तापट भावाच्या कधी आपल्या माहेरच्या हकीकती त्यांना सांगत. भाऊसाहेबही मनापासून त्या ऐकत व त्यावर स्वतःची टीकाटिपणी करीत. उषाताई झोपायला गेल्या की पुन्हा तासभर त्यांचे डिक्टेशन चाले.

मा. विनायकांच्या बंगल्यात आम्ही दोन अडीच वर्षे राहिलो. त्यावर राजारामपुरीत सातव्या गल्लीतल्या मुक्तिधाम बंगल्यात राहायला गेलो. माई चव्हाण यांचा हा बंगला होता. बंगल्यात पाचसहा प्रशस्त खोल्या नि मोठा हॉल होता. हॉलमध्ये छान झोपाळा टांगला होता. संध्याकाळी मी फिरायला गेल्यावेळी या झोपाळ्यावर बसून भाऊंचे वाचन चाले. जमिनीला पायाचा रेटा देऊन हलकासा झोका घेत त्यांची वाचनाची तंद्री लागे. भाऊसाहेबांना बंगाली येत नसले तरी शरचंद्रांच्या मराठीत अनुवादित झालेल्या कादंबऱ्या त्यांना अतिशय आवडत. मानवी अंतःकरणाची सूक्ष्म भावस्पंदने शब्दांकित करण्याची शरचंद्रांची झेप फार मोठी होती. शरदबाबूंच्या बहुतेक कादंबऱ्या मामा वरेरकरांनी मराठीत आणल्या आहेत. पूर्वी त्या भाऊंची त्या वाचल्याही असतील, पण मी त्यांचा मदतनीस झाल्यानंतर, शरचंद्राच्या अनुवादित झालेल्या कादंबऱ्याचे पुनर्वाचन करण्याचे काम माझ्याकडे आले. रात्री जेवण झाल्यानंतर त्या कादंबऱ्यांचे तास दीड तास ते माझ्याकडून वाचून करुन घेऊ लागले. श्रीकांत बडी दिदी, चरित्रहीन, बिराजबहू, शुभदा, गृहत्याग देवदास, पथेरदाबी, शेषप्रश्न या सर्व कादंबऱ्या मी क्रमाक्रमाने वाचू लागलो. कादंबरी ऐकताच ते आरामखुर्चीवर पहुडलेले असत. डोक्याखाली एक नॅपकीन असे आणि डोळे मिटून (झोपून नव्हे) कादंबरीतील पात्राशी ते तल्लीन झालेले असत. शरचंद्रांनी आपल्या कादंबऱ्यातून सुष्टदुष्ट पात्रांचे जे मनोव्यापार उभे केले, मूक वेदना सहन करणारी आणि पती अथवा प्रियकर कसाही अगदी रखलनशील असला तरी जीवनाच्या सर्व पाकळ्यातून त्यांच्यावर प्रेमाचा वर्षात करणारी, समर्पण वृत्तीची जी नायिका त्यांनी वाचकांसमोर ठेवली ती भाऊसाहेबांना विलक्षण आवडत असे.

आम्ही शाहुपुरीत मा. विनायकांच्या बंगल्यात राहात असतानाची गोष्ट. एक दिवस पोस्टातून टपाल घेऊन मी घरी आलो. त्यातले एक पत्र वानलेसवाडीहून आलेले. तिथल्या चेस्ट हॉस्पिटलमधील एका रुग्णाने ते लिहिले होते.' प्रिय भाऊसाहेब, तुमचे अनेक कथासंग्रह, लघुनिबंध–संग्रह मी वाचले आहेत आपण लिहिता ते सर्वच लेखन मला आवडते. माझ्या गावी असताना तुमची एखादी कादंबरी रात्र रात्र जागून मी वाचून पूर्ण करीत असे. तो आख्ख्या दिवस आनंदाच्या झुल्यावर बसून जणू आकाशातून मी तरंगत असे. पण धूर ओकणाऱ्या परळच्या गिरणीतल्या प्रदूषणामुळे मला क्षयरोगाने गाठले. नोकरी सोडावी लागली. माझी बायको खूप कष्टाची कामे करी. दोन महिने तिने कसेबसे घर चालविले. तिच्याही हातातले बळ संपले. कुणाच्या तरी हातापाय पडून तिने शंभर रुपये मिळविले, आणि मला वानलेसवाडीच्या या दवाखान्यात आणले. वानलेसवाडी कसली? वनवासवाडीच आहे ही. गेल्या तीन वर्षात तुमचे एकही पुस्तक मला वाचायला मिळाले नाही. औषधावर खूप खर्च होतो. मग पुस्तके कशी विकत घेणार? आपली पुस्तके वाचायला मिळत नाहीत, म्हणून जीव तळमळतो. अलीकडची आपली काही पुस्तके वाचायला पाठवाल तर थोडक्यात दिवसात माझी बायको मी नसलो तरी ती तुम्हाला परत आणून देईल.' कादंबरीतील आर्त असो, किंवा वास्तवातील कारुण्य असो भाऊंच्या काळजाला ते भिडत असे. त्यांचे डोळे

पाणावले ते पत्र वाचल्यावर कसला तरी विचार करुन ते घाईघाईने उठले. त्यांनी कपाट उघडले आणि अलीकडच्या पाचसह वर्षात प्रसिध्द झालेली आठदहा पुस्तके त्यांनी बाहेर काढली. त्या पुस्तकावर सप्रेम भेट असे लिहून त्यांनी खाली सह्या केल्या. दामू नाईक या विद्यार्थ्यांने त्या पुस्तकाचे पार्सल तयार केले. ते माझ्या हाती देत भाऊ म्हणाले.

कुंभोजकर आणखी अर्ध्या तासाने सांगलीला गाडी आहे. वाननलेसवाडीला उतरा, हा गठ्ठा त्या पेशंटच्या हाती द्या. म्हणावं, भाऊसाहेब उद्या तुम्हाला पत्र पाठवतील. धीर सोडू नका, तुम्ही बरे व्हाल. आता या रोगावर चांगली औषधं खूप निघाली आहेत. ती वेळच्या वेळी घेत जा. बरे वाटू लागल्यावर दोघे अवश्य येऊन मला भेटा.' मी पार्सल हाती घेतले दामू नाईक मला गाडीत बसवून द्यायला स्टेशनवर आला. भाऊंच्या स्वभावातील लहान मोठे ऋजू अनुभव मी घेत होतोच. आत त्यांच्या सहृदयतेचे उत्कट दर्शन मला घडत होते. मी मनातल्या मनात त्यांनी वंदन करीत होतो. त्या दिवशी हे पार्सल त्या रुग्णाला मी  पोचविले. भाऊंचा निरोपही मी त्याला सांगितला. पार्सल हाती पडताच त्या रुग्णाच्या चेहऱ्यावर जो आनंद फुलून आला तो आजही मला स्पष्ट दिसत आहे.

परंतु येण्यासाठी मी गाडीत बसलो. संध्याकाळ केव्हाच झाली होती. मी विनायक बंगल्यावर पोचलो तेव्हा रात्रीचे दहा वाजलेले. वहिनी मुले निवांत झोपली होती. जागे होते फक्त भाऊ. त्या रुग्णाच्या भेटीचा सर्व वृत्तान्त मी त्यांना सांगितला उठा, पाय धुवा भूक लागली असेल ना, भाऊ म्हणाले स्वयंपाकघरात पाट मांडला होता. भाऊंनी ताट माझ्या हाती दिले. पटदिशी पुसून मी ते समोर घेतले तासापूर्वी केलेला भात त्यांनी पुन्हा गरम केला होता. माझे जेवण संपेपर्यंत ते एका स्टुलावर बसून राहिले. जेवण आटोपताच मी माडीवर झोपायला गेलो. भाऊ आपल्या खोलीत गेले.

रात्री दहापर्यंत माझ्या जेवणासाठी ताटकळत बसलेले भाऊ आठवले की आजही मनात गलबलल्या सारखे होते. विद्यार्थ्यांना आपल्या हाताने स्वयंपाक करुन वाटणारे सानेगुरुजी आणि आपल्या लेखनिकाला स्वतःच्या हाताने जेवायला वाटणारे भाऊसाहेब खांडेकर यांत फरक काय ? दोघेही सौजन्य माऊलीच होते. भाऊंच्या घरात त्यांच्या कुटुंबीय असल्याप्रमाणे मी सहा वर्षे वावरलो. उषाताईंनी मला आईची माया दिली, मुलांनी आदरपूर्वक वागविले, हे मी माझ्ये भाग्य समजतो, त्या स्मृती आजही मला आनंद देतात..